# अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ
## Akhil Bharatiy Brahman Mahasangh

दिनांक : १० जानेवारी, २०१४

**प्रेस नोट**

मा. संपादक

खालील बातमीला आपल्या वर्तमानपत्रामधून प्रसिद्धी द्यावी ही विनंती

भालचंद्र कुलकर्णी

### अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाची प्रदेश कार्यकारिणी बैठक अहमदनगर येथे

पुणे : अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाची प्रदेश कार्यकारिणीची बैठक रविवार दि. २ फेब्रुवारी, २०१४ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सायंकाळी ४ वाजेपर्यंत अहमदनगर येथील हॉटेल यश पॅलेस, रेल्वे स्टेशनजवळ येथे होणार आहे.

सदर बैठकीला महाराष्ट्रातील राष्ट्रीय पदाधिकारी, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी, प्रदेश मार्गदर्शक, जिल्हाध्यक्ष व विविध आघाड्यांचे प्रदेश प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहतील. सदर बैठक १० वाजल्यापासून सायंकाळी ४ वाजेपर्यंत तीन सत्रांमध्ये होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री. शाम जोशी, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भूषविणार आहेत.

सत्र पहिले–सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत उद्घाटन सत्र. सदर सत्राला अहमदनगर जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते व मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहेत. सदर बैठकीचे उद्घाटन खासदार मा. श्री. दिलीप गांधी यांच्या शुभ हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे आमदार मा. श्री. अनिल राठोड, महापौर संग्राम जगताप, ज्येष्ठ उद्योजक व मार्गदर्शक अनिल गानू (पुणे) व विनोदभाई त्रिवेदी (मुंबई) उपस्थित राहणार आहेत. सदर बैठकीला राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. गोविंद कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

सत्र दोन व सत्र तीन केवळ निमंत्रितांसाठी आहे. सत्र दोन–११ ते १ वाजेपर्यंत. सदर बैठाकीमध्ये मागील वर्षाच्या कामाचा (ब्राह्मण जोडो अभियान) आढावा घेणे, चालू वर्षी होणारा (तरुणांकरिता करियर निर्माण करण्यासाठी) उद्योग निर्माण वर्षासंदर्भात विचारविनिमय करणे व जिल्हावार निवेदन होणार आहे. त्यानंतर भोजन विराम व दुपारी २ ते ४ वाजता सत्र तीन होणार आहे.

**Office : ' Sneha Smruti ', Ganesh Nagar, Bhosari, Pune - 411 039.**
**Fax : 020 - 27230248, Tel. : 020 - 27230249, Mob.09623430166.**
**e-mail : abbmgkulkarni@gmail.com / kulkarni@brahamanmahasangh.org**
**Visit us : www.bramahanmahasangh.org**